# महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक
# व्दारा आदिवासी विकास आयुक्तालय
# महाराष्ट्र राज्य, नाशिक

---

## अनुसूचित क्षेत्राबाहेरील एकलव्य निवासी शाळांसाठी शिक्षक संवर्गातील पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिजज ( PGT) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक ( (TGT) व क्रीडा शिक्षक नि अध्यापक या पदांची पदभरती करण्यासाठी जाहिरात ज्र .२ स-न २०१७ - १८

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अन्वये केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदानातून महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेमार्फत आदिवासी / आदिम जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्यात **अनुसूचित क्षेत्राबाहेरील** इंग्रजी माध्यमाच्या १) नाशिक २) अजमेर सौंदाणे ता. बागलाण जि. नाशिक ३) खैरीपरसोडा ता. रामटेक जि. नागपूर ४) बोरगाव बाजार ता. देवरी जि. गोंदीया ५) सहस्त्रकुंड ता. किनवट जि.नांदेड येथील एकलव्य निवासी शाळांमध्ये शिक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पात्रताधारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात Online अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. नं. | पदनाम | पदसंख्या | अध्यापन विषय |
|---|---|---|---|
| १ | पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | ११ | इंग्रजी -०१,गणित -०२, जीवशास्त्र-०२, भौतिकशास्त्र-०२, रसायनशास्त्र -०३, मराठी -०१, |
| २ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | ०६ | गणित -०२,मराठी-०३,हिंदी-०१ |
| ३ | क्रीडा शिक्षक नि अध्यापक | ०१ | - |

**१) रिक्त पदांची संख्या व पदनिहाय सामाजिक ( संविधानिक ) आरक्षणाचा तपशिल पुढीलप्रमाणे :-**

| **अ. क्र** | **पदाचे नांव** | **रिक्त पदे** | **अनु. जाती** | **अनु. जमाती** | **वि. ज. भ.ज.** | | | | **वि.मा. प्रवर्ग** | **इ.मा.व.** | **खुला** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | पदव्युत्तर पदविधर प्रशिक्षित शिक्षक | ११ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | - | ०२ | ०३ |
| २ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | ०६ | - | ०१ | ०१ | - | ०१ | ०१ | ०१ | - | ०१ |
| ३ | क्रीडा शिक्षक नि अध्यापक | ०१ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - |

**२) उपरोक्त पदांमध्ये पुढीलप्रमाणे समांतर आरक्षण राहिल.**

| **अ. क्र.** | **पदाचे नांव** | **समांतर आरक्षण पदे** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अनु. जाती** | **अनु. जमाती** | **वि. ज. भ. ज.** | | | | **वि. मा. प्रवर्ग** | **इ.मा.व.** | **खुला** |
| | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | **पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक** | - | मा. सैनिक ०१ | - | - | - | - | - | महिला-०१ मा. सैनिक -०१ | महिला -०२ प्रकल्पग्रस्त -०१ |
| २ | **प्रशिक्षित पदवीधर शिक्षक** | - | - | - | - | - | महिला-०१ | - | | महिला -०१ |

३) **विशेष सूचना :-**

१) जाहिरातीत दर्शविलेली रिक्त पदांची संख्या तसेच सामाजिक व समांतर आरक्षण यात कमी-जास्त बदल होण्याची शक्यता आहे.त्यामुळे भविष्यात रिक्त पदांच्या संख्येत तसेच सामाजिक व समांतर आरक्षण यात कमी जास्त बदल झाल्यास त्याबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

२) सामाजिक व समांतर आरक्षण हे जाहिरातीमधील पदांसाठी लागू असून जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक व प्रशिक्षित पदवीधर शिक्षक या पदांच्या अध्यापन विषयासाठी लागू नाही.

३) पद निहाय पदांच्या संख्येत बदल करणे,अंशतः बदल करणे याबाबत सर्व अधिकार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कुल सोसायटी, नाशिक तथा सचिव, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांनी राखुन ठेवले आहेत.

४) सामाजिक आरक्षणाच्या संबंधात त्या त्या सामाजिक प्रवर्गामध्ये आरक्षणानुसार होणा-या राखीव पदांच्या संख्येचा तपशिल दर्शविण्यात आला आहे.समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातून भरण्यात येतील.

५) सदर पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पदभरतीचे नियम / निकषामध्ये शासन निर्णय,शासन परिपत्रक,शासन पत्र,नियुक्ती प्राधिका-यांचे आदेश या अनुषंगाने बदल करण्यात येतील.

४) **पदांचा तपशिल व पदनिहाय शैक्षणिक / व्यावसायिक पात्रतेचा तपशिल**

| पद क्र. | पदनाम | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | **पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक** | ११ | विषयनिहाय शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी विषयनिहाय शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता त्या त्या अध्यापन विषयासमोर दर्शविण्यात आली आहे. |
| १.१ | इंग्रजी | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.A.with English) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व इंग्रजी विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १.२ | गणित | ०२ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.sc. with Mathematics) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व गणित विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १.३ | जीवशास्त्र | ०२ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.sc. with Biology ) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व जीवशास्त्र विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १.४ | भौतिकशास्त्र | ०२ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.sc. with Physics) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व भौतिकशास्त्र विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १.५ | रसायनशास्त्र | ०३ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.sc. with Chemestry ) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व रसायनशास्त्र विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| १.६ | मराठी | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (M.A.with Marathi) पदव्युत्तर पदवी परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व मराठी विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| २ | **प्रशिक्षित पदवीधर शिक्षक** | ०६ | विषयनिहाय शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी विषयनिहाय शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व त्या त्या अध्यापन विषयासमोर दर्शविण्यात आली आहे. |
| **२.१** | **गणित** | ०२ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (B.sc. with Mathematics) पदवी.परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व गणित विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण तसेच शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| २.२ | मराठी | ०३ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (मराठी स्पेशल विषय घेऊन )बी.ए.परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व मराठी विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण तसेच शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test ) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |
| २.३ | हिन्दी | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची (हिन्दी स्पेशल विषय घेऊन )बी.ए.परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण व हिन्दी विषयाच्या अध्यापन पद्धतीसह बी.एड. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण तसेच शिक्षक पात्रता परिक्षा (Teacher Eligibility Test ) उत्तीर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | असणे आवश्यक आहे. |
| ३ | क्रीडा शिक्षक नि अध्यापक | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची ( B.A. / B.sc.) परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण तसेच B.P.Ed. परीक्षा किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

पद क्रमांक १ ते ३ या सर्व पदांसाठी महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणी / वापरण्याबाबतचे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS – CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**५) पदनिहाय एकत्रित मानधनाचा तपशिल :-**

**एकलव्य निवासी शाळेमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना पुढीलप्रमाणे पदासमोर दर्शविल्यानुसार प्रतिमहा एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील.**

| अ. न. | पदाचे नाव | प्रमिमहा एक त्रित मानधनाची रक्कम |
|---|---|---|
| १ | पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | प्रतिमहा रुपये २०,०००/- एकत्रित मानधन |
| २ | प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | प्रतिमहा रुपये १५,०००/- एकत्रित मानधन |
| ३ | क्रीडा शिक्षक नि अध्यापक | प्रतिमहा रुपये १५,०००/- एकत्रित मानधन |

**६) वयोमर्यादा**

अ) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवाराचे वय दिनांक २८ ऑगष्ट २०१७ रोजी गणले जाईल.खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ३८ वर्षे असावे. मागासवर्गीय उमेदवराचे वय किमान १८ वर्ष पूर्ण व कमाल ४३ वर्ष असावे.

ब) जाहिरातीच्या दिनांकास सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहणार नाही.

**७ ) समांतर आरक्षण**

**अ) महिला आरक्षण** प्रवर्गानुसार रिक्त पदाच्या ३०टक्के आरक्षण हे महिला उमेदवारांसाठी लागू राहील.ज्या पदांसाठी महिला उमेदवार उपलब्ध होणार नाहीत त्या पदावर पुरूष उमेदवाराची निवड करण्यात येईल.खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सक्षम अधिका-याचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**ब) माजी सैनिक :-** नेमणूकीकरिता माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ०३ वर्ष किंवा कमाल ४५ वर्ष वयोमर्यादा राहील.माजी सैनिकाच्या पाल्यासाठी सैनिक कल्याण बोर्डामध्ये नाव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.सेवेत असतांना जर माजी सैनिक युद्धात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना वैद्यकीय दृष्टया कायमचे अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा / पत्नीचा पदभरतीसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार विचार केला जाईल.

**क) प्रकल्पग्रस्त भुकंपग्रस्त :- शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.-एइएम -१०८०/३५/१६-अ दिनांक २१/०१/१९८० व क्र.-न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नाव नमूद कलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

**८)कामाचे क्षेत्र :-** सध्या नाशिक,नागपूर, गोंदीया, नांदेड या जिल्हयातील ज्या अनुसूचित क्षेत्राबाहेरच्या ठिकाणी एकलव्य निवासी शाळा सुरू आहेत अशी ठिकाणे व भविष्यात राज्यातील अनुसूचित क्षेत्राबाहेरच्या ठिकाणी सुरू करण्यात येणा-या एकलव्य निवासी शाळांची ठिकाणे

**९) अर्ज करण्याची पद्धत व सर्वसाधारण अटी / शर्ती : -**

१ जाहिरातीत विहित केलेल्या नमुन्यात अर्ज Online पद्धतीने http: // maharecruitmentmahaonline.gov. in या संकेत स्थळावर भरून त्याची प्रिंट सादर करावी.उमेदवाराची स्वाक्षरी व फोटो नसलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

२ अर्जासोबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे जोडू नये.

३ उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांचा बारकाईने अभ्यास करावा.उमेदवाराने Online सादर केलेल्या अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरून कोणत्याही टप्यावर पडताळणीच्या अधिन राहून अर्ज स्विकृत करण्यात येतील.उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता / आरक्षण उमेदवार धारण करीत नसल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

४ अर्जात चूकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास किंवा योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

५ अपात्र ठरलेल्या अर्जाचे सेवाशुल्क परत केले जाणार नाही.

६ सदरची जाहिरात आदिवासी विकास विभागाच्या **tribal.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर प्रसारीत करण्यात आलेली आहे.

७ जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदांसाठी करण्यात येणारी नेमणूक ही ०३ वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी प्रतिमहा

एकत्रित मानधनावर करण्यात येईल.नेमणूकीच्या दिनांकापासून सलग ०३ वर्ष सेवा पुर्ण केलेल्या शिक्षकांच्या शैक्षणिक कामाचे मूल्यमापन करून मूल्यमापन अहवालाच्या अनुषंगाने ज्या शिक्षकांचे शैक्षणिक काम समाधानकारक असल्याचे आढळून येईल अशा शिक्षकांचा परिविक्षा कालावधी महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या मान्यतेने विलोपित करण्यात येईल.तसेच अशा शिक्षकांना परिविक्षा कालावधी विलोपित केल्याच्या दिनांकापासून पुढील वर्षासाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०१३ / प्र.क्र.६८२ / का-१३ मंत्रालय मुंबई दिनांक ०७ मे २०१५ मध्ये नमूद केल्यानुसार पदनिहाय वेतनश्रेणीतील वेतन व त्यावर अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता देय राहील.

८ सदर जाहिरातींच्या अनुषंगाने विविध पदावर निवड झालेल्या उमेदवारांना केंद्र / राज्य सरकारचे शासकीय कर्मचारी म्हणून संबोधले / गणले जाणार नाही.तसेच त्यांना तसा दावाही सांगता येणार नाही.

९ सदर जाहिरातीच्या अनुषंगाने नेमणूक करण्यात येणा-या कोणाही कर्मचा-यास भविष्यात भविष्यनिर्वाह निधी, गटविमा योजना , अंशदान निवृत्ती वेतन योजना तसेच सेवानिवृत्तीनंतर निवृत्ती वेतन, मृत्यू नि सेवा उपदान, यासह अन्य कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१० नियुक्त करावयाच्या पदांसाठी संस्थेने ठरविलेली वयोमर्यादा,शैक्षणिक अर्हता,कर्तव्ये व जबाबदा-या या नियमांच्या अनुरोधाने व शासनाच्या प्रचलित धोरणानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.

११ जाहिरातीत नमूद केलेले पद भरणे किंवा न भरणे याचे हक्क संस्थेचे अध्यक्ष तथा सचिव आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांना राहतील.

१२ सदर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या सर्व पदांसाठी सामाजिक व समांतर आरक्षणानुसार उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड करण्यात येईल. पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक, प्रशिक्षित पदवीधर शिक्षक व क्रीडा शिक्षक नि अध्यापक या पदावर निवड प्रक्रियेनुसार निवड झालेल्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्राबाहेरील एकलव्य निवासी शाळेतील रिक्त असलेल्या पदावर काम करावे लागेल.

१३ **निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार व रिक्त पदाच्या अनुषंगाने टप्याटप्याने नेमणूक आदेश देण्यात येतील.**

१४ उमेदवाराची नेमणूक ही त्याचे पूर्वचारित्र्य, वर्तणूक,शारीरिक व मानसिक क्षमता याबाबतच्या सक्षम अधिका-यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील.या अनुषंगाने नियुक्त केलेल्या उमेदवाराने शारीरिक / मानसिक पात्रतेचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical fitness Certificate ) तसेच पोलिस निरिक्षक किंवा पोलिस आयुक्त यांचे चारित्र्य पडताळणीचे (Character Certificate) प्रमाणपत्र सेवेत रूजू झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेच्या मुख्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.

१५ उमेदवाराच्या वयासाठी शाळा सोडल्याचा दाखला किंवा एस. एस. सी. परीक्षा प्रमाणपत्रावरील जन्म तारीख ग्राहय धरण्यात येईल.

१६ विवाहित महिला उमेदवारास सक्षम अधिका-यांनी दिलेले विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र व नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले राजपत्र मूळ कागदपत्रे पडताळणीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील

१७ अर्जदार भारताचा नागरिक व महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

१८ उमेदवाराला मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.

१९ जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकाला उमेदवाराने अर्ज केलेल्या पदासाठी जाहिरातीत नमूद केलेली शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणे आवश्यक राहील.

२० मागासवर्गीय उमेदवारांकरीता सक्षम अधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जातपडताळणी समितीने दिलेले जातपडताळणीचे प्रमाणपत्र validity Certificate ग्राहय धरण्यात येईल.

२१ सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी – २००९ / प्र. क्र. २९१ / ०९/ १६ /-ब मंत्रालय मुंबई दिनांक ५ नोव्हेंबर २००९ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्गातील उमेदवारांजवळ जात वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

२२ विमुक्त जाती ( अ ), भटक्या जमाती ब क ड, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या उमेदवारांसाठी उमेदवार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे सक्षम अधिका-याचे(नॉन क्रिमिलेअर ) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

२३ खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील ( इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील ) महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ती / गटातील (क्रिमिलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही .

२४ महिला आरक्षणाकरीता अर्ज करताना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील ( इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती ( ड) या प्रवर्गातील ) महिला उमेदवारांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे सक्षम अधिका-याचे ( नॉन क्रिमिलेअर ) प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२५ जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास शासकीय / निमशासकीय / खाजगी अनुदानित संस्थेत सेवेत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज संबंधित नियुक्ती प्राधिका-यामार्फत सादर करणे आवश्यक राहील.तसेच अर्जासोबत संबंधित नियुक्ती प्राधिका-यांचे **ना हरकत प्रमाणपत्र** सादर करणे बंधनकारक राहील.

२६ महाराष्ट्र नागरी सेवा नियम ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहित उमेदवाराने अर्जासोबत हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

२७ उमेदवाराने सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र तसेच विद्यापीठातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प इत्यादी कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास अर्जात तसा उल्लेख करणे आवश्यक राहील.

२८ **पदवी/पदव्युत्तर पदवी व बी.एड. परीक्षेस ५० टक्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवावरांना मूळ शैक्षणिक पात्रतेची व अन्य आवश्यक त्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालय,आदिवासी विकास भवन,गडकरी चौक,नाशिक येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.त्यासाठी संस्थेकडून कोणत्याही प्रकारचा दैनिक भत्ता किंवा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.तसेच प्रमाणपत्र पडताळणीच्या तारखेनंतर मुदतवाढ दिली जाणार नाही किंवा संबंधित उमेदवारास नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.**

२९ अर्जात चूकीची किंवा अपूर्ण माहिती नोंदविली असल्यास तसेच अर्जदार उमेदवार निकषानुसार पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज अपात्र ठरविला जाईल.

३० उमेदवाराने अर्जासोबत सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी / बनावट / खाडाखोड केलेली / अवैध / संबंधीत शासन आदेश / नियमानुसार जारी न केलेले अथवा सक्षम अधिका-यांनी प्रदान न केल्याचे आढळून आल्यास अशा उमेदवाराची निवडीसाठी शिफारस झाली असल्यास ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल. तसेच इतरही कायदे / नियमानुसार संबंधित उमेदवाराविरूद्ध कारवाई करण्यात येईल.

३१ जाहिरातीच्या अनुषंगाने मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीअंती उमेदवारांची अंतिम निवड करणे किंवा झालेली निवड रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार संस्थेच्या नियुक्ती प्राधिका-यास राहील.

३२ **सदर जाहिरात प्रसिद्ध / प्रसारीत होण्यापुर्वी अर्जदारास गैरशिस्त वर्तन/नैतिक अधःपतनाच्या कारणास्तव यापूर्वीच्या कार्यालयाने/ संस्थेने सेवेतून बडतर्फ / सेवासमाप्तीची कार्यवाही केली असल्यास अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.**

३३ अवैध मार्गाने निवड होण्यासाठी एखाद्या उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या वतीने अन्य कोणीही इसमाने निवड समितीचे अध्यक्ष, सदस्य सचिव किंवा निवड समितीमधील अन्य अधिका-यांवर किंवा कर्मचा-यांवर कोणत्याही प्रकारचा दबाव, दडपण आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास अशा उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल व हा निर्णय अंतिम राहील.

३४ निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीचे ठीकाणी हजर होण्यापूर्वी सक्षम अधिका-याने दिलेला जातीचा दाखला ,जात पडताळणी प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, शैक्षणिक पात्रतेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र, अनुभवाचे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षणमंडळ मुंबई यांचेकडील MS – CIT - परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र सक्षम अधिका-याचे नेमणूकीस मान्यता दिल्याचे पत्र इ. प्रमाणपत्रांची तपासणी करण्यासाठी आदिवासी विकास आयुक्तालय,आदिवासी विकास भवन, गडकरी चौक नाशिक येथे स्वखर्चाने समक्ष हजर राहणे बंधनकारक राहील. यासाठी कोणाही **उमेदवारास मुदतवाढ देण्यात येणार नाही. दिलेल्या मुदतीनंतर कोणाही उमेदवारास नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्यासाठी परवानगी दिली जाणार नाही.**

३५ नियुक्त केलेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या कालावधीत कोणत्याही स्वरूपाचे गैरवर्तन केल्यास त्याची नियुक्ती रद्द करण्यात यईल / सेवा समाप्त करण्यात येईल.

३६ एकलव्य निवासी शाळेमध्ये निवड झालेल्या उमेदवारास संस्थेच्या नियुक्ती प्राधिका-याची लेखी परवानगी घेवून अन्य नोकरीसाठी अर्ज करता येईल.व अशा प्रकारे निवड झालेल्या उमेदवारास विहीत पद्धतीचा अवलंब करून अन्य नोकरीच्या ठीकाणी हजर होण्यापूर्वी महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक या संस्थेकडे एक महिना अगोदर राजीनाम्याची नोटीस देणे व एक महिण्याचे मानधन संस्थेकडे जमा करून राजीनामा सादर करणे बंधनकारक राहील.

३७ निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या मुख्यालयाचे ठिकाणी निवासी राहणे बंधनकारक राहील.

३८ जाहिरातीत नमूद केलेले पद भरणे किंवा न भरणे याचा हक्क संस्थेने राखून ठेवला आहे.

३९ सदर पदभरती प्रक्रियेअंतर्गत निर्माण होणा-या संभाव्य अडचणींच्या संदर्भात संस्थेचे अध्यक्ष तथा सचिव, आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम असतील.

**१०) निवड पद्धती**

१) अ) पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक या पदासाठी उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करतांना उमेदवारास संबंधित विषयाच्या पदव्युत्तर परिक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५०टक्के गुण व बी. एड परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५० टक्के गुण यांची बेरीज करून गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल.

ब) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक या पदासाठी उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करतांना उमेदवारास संबंधित विषयाच्या पदवी परिक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५०टक्के गुण व बी. एड परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५० टक्के गुण यांची बेरीज करून गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. तथापि गुणवत्ताधारक उमेदवार हा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परीषद पुणे या संस्थेद्वारा TET पात्रताधारक असणे बंधनकारक राहील.

क) क्रीडा शिक्षक नि अध्यापक या पदासाठी उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करतांना उमेदवारास संबंधित विषयाच्या पदवी परिक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५०टक्के गुण व बी. पी.एड परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीच्या ५० टक्के गुण यांची बेरीज करून गुणानुक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल.

सदर तीनही पदासाठी गुणानुक्रमानुसार यादी तयार केल्यानंतर जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या अध्यापन विषयाच्या अनुषंगाने गुणवत्तेनुसार सामाजिक व समांतर आरक्षणानुसार निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

२) गुणवत्ताधारक उमेदवारांची नावे गुणवत्तेनुसार आदिवासी विकास विभागाच्या **tribal.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.

**११) निवडसूची कालावधी :** - सदर जाहिरातीनुसार पदभरती प्रक्रियेच्या अनुषंगाने निवड व प्रतिक्षासूचीचा कालावधी हा शासनाने विहित केल्यानुसार विधीग्राहय राहील.त्यानंतर निवड व प्रतिक्षासूची व्यपगत होईल.

१२) Online अर्ज भरण्याचा दिनांक २८ ऑगष्ट २०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत राहील.

**अनुक्रमांक १ ते ३ पदांसाठी प्रत्येक उमेदवारास भरावे लागणारे सेवा शुल्क रूपये २३.६०/-**

Online अर्ज सादर करण्याची पद्धत

| पदाचे नाव | पद संकेतांक | पदांची संख्या |
|---|---|---|
| पदव्युत्तर पदवीधर प्रशिक्षित शिक्षक | १ | ११ |
| प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | २ | ०६ |
| क्रीडा शिक्षक नि अध्यापक | ३ | ०१ |
| एकूण | | १८ |

१) **अर्हताधारक उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत** http: // maharecruitment.mahaonline.gov. in **या संकेत स्थळावर जावून** Online अर्ज भरण्याची लिंक ( Link ) उघडावी.

२) **भरती प्रक्रीयेसंबंधिच्या सर्व अटी - शर्ती असलेल्या माहिती पुस्तीकेची प्रिंट काढावी.**

३) **जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे उमेदवार जर सदर पदास पात्र ठरते असेल तर संकेत स्थळावर जावून** Online अर्ज भरावा.

४) **अर्जात नमूद केलेले सर्व रकाने भरल्यानंतर अर्जात फोटो व स्वाक्षरी स्कॅन करून** Online पद्धतीने दिलेल्या ठिकाणावर अप्लोड करावी.

५) **चलनाची प्रिंट काढल्यानंतर अर्जासोबत जोडलेले चलन उमेदवाराने त्याच्या जवळच्या** STATE BANK OF INDIA **च्या कोणत्याही शाखेत जावून सदर चलन आवश्यक त्या रकमेसह जामा करावे.चलन जमा केल्यानंतर बँकेने पदत दिलेल्या चलनाच्या प्रतिवरील क्रमांक व दिनांक संकेत स्थळावर जावून अपलोड करावा.व परत परिपूर्ण अर्जाची प्रिंट काढून उमेदवाराने स्वतःजवळ जतन करावी.सदरची प्रिंट ही मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.**

६) **उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर त्यास अर्जाची सद्यस्थिती कळावी.यासाठी स्वतःचा** E-MAIL ID **तयार करून मोबाईल क्रमांक व** E-MAIL ID**अर्जात नमूद करणे बंधनकारक राहील.**

७) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या उमेदवाराने अर्ज करू नये.

८) उमेदवाराला एकापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र सेवा शुल्क भरावे लागेल.

९) Online भरलेला अर्ज व प्रत्यक्षात पिंट केलेला अर्ज यामध्ये तफावत आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल

स्थळ प्रतिवर मा. सदस्य सचिव तथा
आयुक्त महोदयांची स्वाक्षरी आहे.

**सदस्य सचिव,**
**महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक**
**तथा आयुक्त,आदिवासी विकास विभाग**

महाराष्ट्र राज्य नाशिककरीता

**अनुसूचित क्षेत्राबाहेरील एकलव्य निवासी शाळेत शिक्षक संवर्गातील पदांची पदभरती जाहिरात क्र.२ सन २०१७-२०१८**

## अर्जाचा नमूना

**पदनाम ---------------------------------------------------- अध्यापन विषय ---------------------------------------------**

**प्रती,**

**मा.सदस्य सचिव,**

**महाराष्ट्र ट्रायबल पब्लीक स्कूल सोसायटी नाशिक**

**तथा आयुक्त, आदिवासी विकास,विभाग**

**महाराष्ट्र राज्य, नाशिक – ४२२ ००२**

अर्जदाराचा फोटो

<table>
<tr><td rowspan="2">१</td><td rowspan="2">अर्जदारचे नांव</td><td colspan="3">आडनाव</td><td colspan="4">स्वतःचे नाव</td><td colspan="3">वडिलांचे / पतीचे नाव</td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="4"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="2">२</td><td rowspan="2">अर्जदार विवाहित महिला असल्यास विवाहापूर्वीचे नांव</td><td colspan="3">आडनांव</td><td colspan="4">स्वतःचे नांव</td><td colspan="3">वडिलांचे नांव</td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="4"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>३</td><td>पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता<br>(दुरध्वनी क्रमांकासह)</td><td colspan="10"><br><br>ई मेल आय डी                              दुरध्वनी क्र.</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">जन्म दिनांक (अंकी )</td><td colspan="3">दिनांक</td><td colspan="4">महिना</td><td colspan="3">वर्ष</td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="4"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>५</td><td>जन्म दिनांक (अक्षरी )</td><td colspan="10"></td></tr>
<tr><td rowspan="2">६</td><td rowspan="2">दिनांक २८ ऑगष्ट २०१७ रोजी पूर्ण होणारे वय</td><td colspan="3">वर्ष</td><td colspan="4">महिना</td><td colspan="3">दिवस</td></tr>
<tr><td colspan="3"></td><td colspan="4"></td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>७</td><td>धर्म व जात</td><td colspan="3"></td><td>८</td><td colspan="6">लिंग - पुरूष / स्त्री – (                )</td></tr>
<tr><td rowspan="3">९</td><td rowspan="3">अर्जदाराने ज्या प्रवर्गातून अर्ज केला आहे त्या प्रवर्गाच्या चौकोनात 'होय' लिहावे.</td><td rowspan="2">अनु जाती</td><td rowspan="2">अनु जमाती</td><td colspan="4">विमुक्त जाती भटक्या जमाती</td><td rowspan="2">विशेष मागास प्रवर्ग</td><td rowspan="2">इतर मागास वर्ग</td><td rowspan="2">खुला</td><td rowspan="2"></td></tr>
<tr><td>अ</td><td>ब</td><td>क</td><td>ड</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="11">अर्जदाराने महिला आरक्षणातून निवड होण्यासाठी अर्ज केला आहे काय? -होय/नाही – (        )</td></tr>
<tr><td>११</td><td colspan="8">अर्जदार उन्नत व प्रगत गटात आहे काय? होय / नाही - (          )</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="4">अर्जदार विवाहित आहे काय? होय / नाही</td><td colspan="2"></td><td colspan="4">असल्यास अपत्यांची संख्या<br>दिनांक २८/०३/२००५ नंतर<br>आणि २८/०६/२००६ नंतर</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>राष्ट्रीयत्व</td><td colspan="10"></td></tr>
<tr><td>१४</td><td>महाराष्ट्रातील मुळ रहिवासी आहेत काय?</td><td colspan="10">होय / नाही (            )</td></tr>
<tr><td rowspan="2">१५</td><td rowspan="2">माजी सैनिक असल्यास (चौकोनात 'होय' असे लिहावे )</td><td colspan="2" rowspan="2">माजी सैनिक</td><td colspan="7">सेवेत असतांना युद्धात दिवंगत झाल्याने / वैद्यकीय दृष्टया कायमचे अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांचे अर्जदार हे पाल्य / पत्नी आहे काय ?</td><td rowspan="2"></td></tr>
<tr><td colspan="7">सैनिक कल्याण बोर्डात नाव नोंदणी केली आहे ?</td></tr>
</table>

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | उमेदवार प्रकल्पग्रस्त / भुकंप ग्रस्त आहे काय ? | होय / नाही | असल्यास जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी उमेदवाराच्या नावचे प्रमाणपत्र दिले आहे काय ? | |

**१७. दिनांक २८ ऑगष्ट २०१७ रोजी उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र. | परिक्षा | अध्यापन विषय | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्के वारी | श्रेणी | उत्तीर्ण वर्ष | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बी.ए. | | | | | | | |
| २ | बी.एस. सी. | | | | | | | |
| ३ | एम. ए. | | | | | | | |
| ४ | एम.एस.सी. | | | | | | | |
| ५ | बी.एड | | | | | | | |
| ६ | B.Ped | | | | | | | |
| ७ | T.E.T. Exam | | | | | | | |
| ८ | MS-CIT Exam. | | | | | | | |

**१८. नोकरीसाठी रोजगार / स्वयंरोजगार / विद्यापीठ / प्रकल्प कार्यालयातील नाव नोंदणीचा तपशिल**

| अ. न. | नाव नोंदणी केंद्र | नोंदणी केंद्राचे नाव | नाव नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १) | सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार मार्गदर्शन केंद्र | | |
| २) | रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र.-------- ---------------------------------- - -------विद्यापीठ | | |
| ३) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालय | | |

**महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ नुसार**

**मी श्री./ श्रीमती/ कुमारी ------------------------------------- ------------- ------------------------------------------------- श्री. ------------------------------------------------------------यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ---------------वर्ष राहणार --------------------- श्री./ श्रीमती ----------------------------------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,**

**१) मी -------------------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.**

**२) आज रोजी मला --------------------- इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------------------- असून त्यांचा जन्मदिनांक ---------------,---------------------आहे.**

**३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.**

**दिनांक :-** **अर्जदाराची स्वाक्षरी**

**ठिकाण :-**